दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१०२ बुधवार,दि.१८ डिसेंबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-102 Wednesday, Dt.18 December 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## भीमसैनिकासह इतर समाज बांधवांनी रॅली काढत केला निषेध

शिरूर ।प्रतिनिधी

परभणीतील झालेल्या कोंबिंग ऑपरेशन मध्ये एका निष्पाप भीमसैनिकाचा पोलीस कोठडीतच मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे त्याचे पडसाद बीड जिल्ह्यात सुद्धा पसरले असून त्याच अनुषंगाने शिरूर येथे याप्रकरणी छत्रपती संभाजी महाराज चौक ते जिजामाता चौक अशी भीमसैनिकांनी व इतर समाज बांधवांनी रॅली काढत

(उर्वरीत पान २ वर)

# अधिवेशन संपण्यापूर्वी सरपंच हत्याप्रकरणी मास्टरमाईंड वाल्मीक कराडला अटक करा

## नागपूरच्या अधिवेशनात आमदार संदीप क्षीरसागर यांचा थेट सरकारला इशारा

**नागपूर ।प्रतिनिधी**

**मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या अपहरण प्रकरणात आ.संदीप क्षीरसागर सातत्याने आक्रमक भूमिका घेत प्रकरणाचा मास्टरमाईंड समोर आणण्याची मागणी करत आहेत. यातच नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या सत्रातही आ.क्षीरसागर यांनी या गुन्ह्यातील सर्व आरोपी आणि मास्टरमाईंड वाल्मीक कराडला अटक करण्याची मागणी केली.**

मंगळवारी (दि.१७) रोजी विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसर्या दिवशी सकाळच्या सत्रात आ.संदीप क्षीरसागर यांनी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्त्या प्रकरणावर आक्रमकपणे प्रश्न उपस्थित केले. स्व.संतोष देशमुख यांच्या हत्त्या




प्रकरणात करता करविता हा वाल्मीक कराड आहे. परंतु तपासाची दिशा बदलविण्याकरीता आणि प्रकरणावरील लक्ष विचलित करण्यासाठी त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. स्व.देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हाच मास्टरमाईंड आहे, हे संपूर्ण जिल्ह्याला माहीत असताना अपहरण आणि खूनाच्या प्रकरणातून नाव वगळण्यात आले आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील मास्टरमाईंड वाल्मीक कराड ला अधिवेशन संपण्यापूर्वी अटक करा अन्यथा जिल्ह्यातील जनतेचा प्रचंड रोष आहे, आणि त्या रोषाला, सत्ताधाऱ्यांना सामोरे जावे लागणार असल्याचे सांगितले. यासोबतच आमदार असताना सुरक्षेसाठी पोलीस विभागाकडून एक अंगरक्षक देण्यात येतो पण वाल्मीक कराड सारख्या गुन्हेगाराला मात्र दोन-दोन अंगरक्षक देण्यात येतात! असाही प्रश्न आ.क्षीरसागर यांनी यावेळी उपस्थित केला.

## संतोष देशमुख हत्याकांडाची चौकशी ही निवृत्त न्यायाधीशा मार्फत व्हावी- रोहित पवार

### हत्याकांडातील मास्टर माईंड कराड यांना वाचविले जात असल्याने बीड जिल्ह्याचे पालकत्व मुख्यमंत्र्यांनी स्वीकारावे - आ.रोहित पवार

केज/प्रतिनिधी

संतोष देशमुख यांच्या हत्याकांड हे दुर्दैवी असून मास्टर माईंडला वाचविले जात असल्याचा आरोप रोहीत पवार यांनी सरकार वर केला.तर या प्रकरणी न्यायालयीन चौकशीची मागणी त्यांनी केली. कारण एसआयटी आणि निव्वळ वेळ काढूपणा असून अशा प्रकारच्या अनेक चौकशा होतात. परंतु पुढे काय होते हे आपण पाहिले आहे.असे ते म्हणाले.तसेच याचा तपास करण्यासाठी मुख्यमंत्र्यानी स्वतः बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारावी अशीही मागणी त्यांनी केली आहे.

या बाबतची माहिती अशी की,दि.१७ डिसेंबर रोजी आ.रोहित पवार हे मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमख हत्याकांड प्रकरणी



त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन करण्यासाठी मस्साजोग येथे आले होते.या वेळी त्यांच्या सोबत माजी आ. पृथ्वीराज साठे,माजी आ. सय्यद सलीम,सक्षणा सलगर,राजेसाहेबदेशमुख,डॉ.नरेंद्र काळे,संजीवनी देशमुख,राधाताई सकपाळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी आ.रोहित पवार यांनी संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची चौकशी ही निवृत्त न्यायाधीश किंवा एखाद्या नि:पक्षपातीपणे काम करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्या मार्फत केली जावी.कारण अशा एसआयटीच्या चौकशा म्हणजे निव्वळ वेळकाढू पणा आहे.यापूर्वी अनेक प्रकरणात अशा चौकशा झाल्या आहेत परंतु त्याचे फलित काय? असे एसआयटी चौकशीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुख्यमंत्री

(उर्वरीत पान २ वर)

## ऊस तोडणी कामगारांना देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कम व्यवहाराला कायद्याचे संरक्षण देण्यात यावे- आ.सुरेश धस

### मा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषा वरील आभार आणि राज्य सरकारचे अभिनंदन प्रस्तावावर बोलताना केली मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

साखर कारखाना व्यवस्थापन ऊसतोड कामगार कामगारांना अग्रीम उचल रक्कम देतात मात्र त्यासाठी वाहतूकदार आणि मुकादम यांना जबाबदार ठरवून त्यांच्याकडून कायदेशीर दस्तऐवज करून घेतात मात्र ऊस तोडणी कामगारातील काही कामगार हे कामाला न जाता अग्रीम रक्कम इतरत्र खर्च करतात ही रक्कम परत मिळवणे सहजासहजी शक्य होत नाही त्यातून अनेक पेज प्रसंग निर्माण होत असल्यामुळे अनेक मुकादमांनी वाहतूकदारांनी आत्महत्या केलेले आहेत त्यामुळे या उचल रकमे च्या व्यवहारास कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी अशासकीय विधेयक मांडणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषण वर आभार व्यक्त करताना




आणि राज्य सरकारच्या अभिनंदन प्रस्तावा प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,जेव्हा विरोधकांचे दिल के टूकडे हजार हुये कोई यहा गिरा कोई वहा गीरा अशी अवस्था झाली म्हणून आता त्यांनी जनतेला मारकडवाडी दाखविण्याचे काम केले. लोकसभा निवडणुकीमध्ये ३१ खासदार निवडून आले त्यावेळी त्यांनी ईव्हीएमला आक्षेप घेतला नाही आले मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला त्या वेळी त्यांनी ईव्हीएमला दोष देण्याचे काम सुरू केले आहे हे रडगाणे असून दुर्दैवी असल्याचे सांगत आमदार सुरेश धस यांनी पंतप्रधान नरेंद्र जी मोदी साहेब यांनी पंतप्रधान आवास योजना शहरी आणि ग्रामीण या दोन्हीसाठी घसघशीत वाढ केल्यामुळे गोरगरिबांची घरे तयार होणार असून त्यातून निवारा

(उर्वरीत पान २ वर)

## पाटोदा तालुक्यातील मंझरी (घाट) जलजीवन योजनेंतर्गत कामाच्या चौकशीसाठी दोन दिवसांपासून ग्रामस्थांचे उपोषण सुरू

### आधिका-यांचे दुर्लक्ष ; तातडीने काम सुरू करण्याच्या लेखी आश्वासनानंतर बेमुदत उपोषण मागे

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मंझरी ( घाट) येथील ग्रामस्थ जलजीवन योजनेंतर्गत ६७ लक्ष रूपये कामाच्या निकृष्ट दर्जाचे व रखडलेले काम पूर्ण करण्यात यावे यासाठी २ दिवसांपासून ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले असुन २ दिवसात जलजीवन आधिका-यांनी उपोषणाची दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना विनंती केल्यानंतर डॉ.गणेश ढवळे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेत राजेंद्र मोराळे प्रकल्प जलजीवन मिशन जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद सांधत ग्रामस्थांची कैफियत मांडली. राजेंद्र मोराळे यांनी संबंधित उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग पाटोदा कुलकर्णी यांना फोन करून आंदोलनस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या समस्या ऐकून निराकरण करण्यात येईल असे डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

पाटोदा तालुक्यातील ६५० लोकसंख्या असलेल्या मंझरी ( घाट) गावातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत २ वर्षांपूर्वी ६७ लाख रुपये मंजूर झाले. गेल्यावर्षी पावसाळ्यात गावातील सिमेंट रस्ते खोदून निकृष्ट दर्जाचे पाईप टाकण्यात आले. विहिरीचे काम करण्यात आले नाही. टाकीचे काम निकृष्ट असुन पाणी मारले नाही. योजना अपुर्ण असून ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. वर्षभरापासून कंत्राटदार व अधिकारी यांना काम पूर्ण करण्याचे लेखी निवेदन देऊनही कोणतीही दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी दोन दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर कडाक्याच्या थंडीत बेमुदत उपोषण सुरू केले असुन आज दुपारपर्यंत कोणत्याही आधिका-याने उपोषणाला भेट दिली नाही. यावेळी आंदोलनात प्रकाश नांदे, बाजीराव गिते, आकाश नांदे, पोपट शिंदे, प्रल्हाद भांबे,संदिप गिते, ईश्वर नांदे, महादेव भांबे, प्रकाश गिते,संजय गिते संगीत नांदे, श्रीराम नांदे, महादेव नांदे, लक्ष्मण नांदे आदी ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

आज दुपारनंतर ४ वाजता कुलकर्णी उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग पाटोदा जिल्हा परिषद बीड यांनी तातडीने उर्वरित काम करण्यात येईल तसेच कामात काही त्रुटी उणिवा राहणार नाही याची दक्षता घेऊन १५ दिवसात गावाला पाणीपुरवठा करण्यात येईल असे लेखी दिल्यानंतर जयदत्त धस यांच्या हस्ते पाणी पिऊन आंदोलनकर्ते यांनी २ दिवसांपासून सुरू असलेले बेमुदत उपोषण मागे घेतले.

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर
डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे
(नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर
व लेझर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच
महिला मुळव्याध तज्ञ
डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूगणांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.
मुळव्याध करीता विशेष उपचार
- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पिटलचा पत्ता
शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँडच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009



## घाटनांदूर येथे रेल्वे गाड्या थांबवा

### खा.बजरंग सोनवणेंनी दिले रेल्वे बोर्ड अध्यक्षांना निवेदन

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील घाटनांदूर रेल्वे स्थानक, सामान्य प्रवाशी आणि मालवाहतूक करण्यासाठी महत्वाचे स्थानक आहे. परंतू या रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून रेल्वे गाड्या थांबविणे बंद झाले आहे.परिणामी घाटनांदूर भागातील नागरिकांना रेल्वे स्थानक असताना देखील फायदा होत

(उर्वरीत पान २ वर)

## पैठण नाथ सागर धरणातून २०० क्युसेसने उजव्या कालव्यात विसर्ग सुरू

पैठण ।प्रतिनिधी

पैठण येथील नाथसागर धरणातून शेतकऱ्याच्या रब्बी पिकासाठी उजव्या कालव्यातून सोमवार दि.१६ रोजी दुपारी पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे. चालू हंगामातील शेतकऱ्यांच्या रब्बी पिकासाठी कालव्यातून पाटबंधारे विभागाने सुरू केलेल्या रब्बी पाणी पाळी क्रमांक १ पैठण पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, धरण उपअभियंता विजय काकडे यांनी दुपारी उजवा कालव्यात २०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू

(उर्वरीत पान २ वर)



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# आला नाही तोवर तुम्ही

साधारण ७३ वर्षांपूर्वी १९५१ साली मुंबईतल्या माहीममधल्या चाळीत एका खोलीच्या घरात बावी बेगम यांच्या पोटी पहिला मुलगा जेव्हा जन्माला आला तेव्हा त्या बेगमचे शोहर अल्लारखा कुरेशी यांनी त्या अर्भकाच्या कानात अल्लाच्या आशीर्वाद वचनांआधी तबल्याचे बोल ऐकवले. त्या वेळी बावीजान रागावल्या. त्यावर 'तबल्याचे बोल ही 'कुरआन'च्या आयतांइतकीच पवित्र इबादत आहे' असे अल्लारखा आपल्या बीबीस समजावते झाले. जन्मल्या जन्मल्या 'अडगुलं मडगुला'ऐवजी आडा-चौताल कानात साठवून घेणारा हा मुलगा अवघ्या तिसऱ्या वर्षी तबल्यावर बसला आणि १२ व्या वर्षी त्याची पहिली बैठक झाली. इतकेच नव्हे तर अमेरिकेतल्या विद्यापीठात जेव्हा तो शिकवू लागला तेव्हा त्याने विशीही गाठलेली नव्हती. तबला हाच ज्याचा श्वास होता, तबला हाच ज्याचा प्राण होता, तबला हेच ज्याचे जगणे होते आणि अल्लारखा त्याच्या कानात सांगून गेले त्याप्रमाणे तबला हीच ज्याची 'इबादत' होती त्या झाकीर हुसेन यांनी आज अमेरिकेत आपला अखेरचा श्वास घेतला. तबलजी, तबलापटू, पट्टीचे तबलिये इत्यादी शब्द त्यांची ओळख, त्यांचे मोठेपण, त्यांची कारकीर्द आणि त्यांनी आपणास काय दिले हे सांगण्यास कमालीचे अपूर्ण आहेत. झाकीर हुसेन यांच्यासारखा 'पूर्णकलाकार' कसा आकारास येतो हे लक्षात घेतल्याखेरीज त्यांचे जाणे म्हणजे काय हे लक्षात येणार नाही.

झाकीर अशा भारतात, अशा काळात जन्मले की त्यांच्या दिवसाची सुरुवात सरस्वती वंदनेने होत असे, नंतर माहीमच्या दर्ग्यात दुआ झाल्यानंतर 'कॉन्व्हेन्ट स्कूल'मधे येशूसमोरील प्रार्थनेने कोवळी उन्हे उतरत. पुढील आयुष्यात 'फ्यूजन' त्यांना सहजसाध्य का झाले हे यावरून लक्षात येईल. त्या वेळचा भारत हा मूर्तिमंत फ्यूजन होता आणि झाकीर हुसेन 'त्या' भारताचे पाईक होते. पंजाब घराण्याची दिलेरी, इस्लामच्या सुफी पंथातून आलेली फकिरी आणि घरंदाज गाण्याबजावण्यातून आलेली लकेरी ही त्यांच्या रक्तात होती. वडील गंडाबंद गुरू होते तरी पारंपरिक उस्तादांसारखे झापडबंद नव्हते. घराणे ही सोय आहे, ती सौंदर्यासक्तीच्या आड येऊ द्यायची नसते हे झाकीर यांना वडिलांकडून उमगले. सिनेसंगीत म्हटले की लाहौलबिलाकुवत म्हणत अल्लारखांनी कधी तोबा तोबा केले नाही. ते स्वत: चित्रपट संगीतकार होते आणि संगीतातील विविध प्रयोग ही त्यांची खासियत होती. झाकीर हुसेन यांनी ती अधिक उंचीवर नेली. तथापि प्रयोगात, आविष्कार यातील नावीन्यासाठी ओळखले जाणारे अल्लारखा गुरू म्हणून कमालीचे कडवे कडक होते. झाकीर यांची तालीम पहाटे तीनच्या ठोक्यास सुरू होत असे. त्यासाठी तबल्याआधी त्यांना हात साफ करावे लागत ते तबलासदृश भरीव लाकडाच्या ओंडक्यांवर. ''त्या घट्ट खोडांवर वाजवून वाजवून नखांतून रक्त येत असे, पण अब्बाजान तालीम थांबवत नसत'', अशी आपल्या तालमीविषयीची आठवण झाकीर हुसेन यांनीच पुढे एकदा सांगितली आहे. त्यांच्या बोटांचा स्पर्श झाल्या झाल्या तबला आणि डग्गा का बोलू आणि गाऊ लागत याचे उत्तर त्यांच्या या ओंडक्यावरील तालमींत आहे. लहानपणी असे आणि इतके कष्ट घेतलेले हात जेव्हा तबल्यावर पडत तेव्हा समोरून 'क्या बात है'ची दाद हा केवळ प्रतिध्वनी ठरत असे. असा प्रतिध्वनी झाकीरजींच्या कानी आयुष्यभर पडत आला. खरे तर झाकीरजी अभिनेतेच व्हायचे. 'मुगल-ए-आझम'मधे पोरसवदा सलीमच्या भूमिकेत खरे तर झाकीरजीच दिसणार होते. तशी शिफारस खुद्द दिलीप कुमार यांनी केली होती. पण अल्लारखांना हे दिल बहकावे मंजूर नव्हते. संगीत हीच झाकीर यांची प्राथमिकता राहील याबाबत ते डोळ्यात तेल घालून खबरदारी घेत. अल्लारखा यांचा चित्रपट दुनियेस नकार नव्हता. तर संगीत सोडून अभिनय वगैरे करण्यास त्यांचा विरोध होता. म्हणूनही असेल मग झाकीरजी चित्रपटांशी सुरुवातीच्या काळात तरी संगीतसंबंधच ठेवते झाले. लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या पहिल्यावहिल्या 'पारसमणी'तील 'वो जब याद आये, बहोत याद आये' या ठुमरी अंगाने जाणाऱ्या अजरामर गाण्यात उठून ऐकू येणारा ठेका झाकीरजींचा. पुढे स्वत: संगीतकार झाल्यावर 'मि. अँड मिसेस अय्यर' या चित्रपटात 'किथे मेहेर अली' हे गाणे त्यांनी 'पिया बसंती रे'वाल्या सुलतान खाँ यांच्या ओढत्या आवाजात गाऊन घेतले.

# सोमनाथ सूर्यवंशी आणि संतोष देशमुख प्रकरणी केज येथे रिपाइं (ए) चे तीव्र निदर्शने

केज/प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यातील सोमनाथ सूर्यवंशी आणि केज तालुक्यातील येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी केज येथे तालुका रिपाइं (ए) च्या वतीने तहसील कार्यालया समोर तीव्र निदर्शने करण्यात आले.या बाबत ची सविस्तर माहिती अशी की,परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्याच्या निषेधार्थ भीम अनुयायी शांततेच्या मार्गाने आंदोलन करीत असताना पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज केला.त्याचे व्हिडिओ चित्रण हा सोमनाथ सूर्यवंशी हा कायद्याचे शिक्षण घेणारा विद्यार्थी करीत असताना पोलिसांनी त्यालाअमानुष मारहाण केली.त्या मारहाणीमुळे त्याचा मृत्यू हा न्यायालयीन कोठडीत झाला.त्यांचाशवविच्छेदन अहवाल देखील प्राप्त झालेला आहे.अहवालात त्यांचा मृत्यू हा मारहाणी मुळे गंभीर जखमा झाल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याचा स्पष्ट अहवाल प्राप्त झालेला आहे.तसेच मस्साजोग ता. केज येथे पवनचक्की प्रकल्पाच्या कार्यालयात खंडणी मागणीसाठी गेलेले गुंड हे तेथीलसुरक्षा रक्षकांना मारहाण करीत असल्याने सरपंच संतोष देशमुख हे त्यांच्या बचावा साठी तेथे गेले होते.त्याचा राग मनात धरून गुंडांनी संतोष देशमुख यांना टोल नाक्यावर अडवून त्यांचे अपहरण केले आणि अत्यंत निर्घृणपणे व मानवतेला काळीमा लागेल अशा पद्धतीने त्यांची हत्या केली.या दोन्ही घटनेचा निषेध दि. १७ डिसेंबर रोजी रिपाइं (ए)चे नेते




सामाजिक न्यायमंत्री ना.रामदास आठवले आणि युवा रिपाईंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शना खाली तालुकाध्यक्षदिपक कांबळे यांच्या नेतृत्वा खाली तहसील कार्यालया वर तीव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड,जिल्हा सल्लागार उत्तम मस्के,युवा रिपाइंचे निलेश ढोबळे,रमेश निशिगंध,जेष्ठ नेते दिलीप बनसोडे,नाना गायकवाड, सूरज काळे,विनोद गायकवाड,रोहित बचुटे, रंजित कांबळे,दादासाहेब धेंडे,हरेंद्र तुपारे,राजेंद्र धीरे,मसु बचुटे,मिलिंद भालेराव,विनोद शिंदे सरचिटणीस गौतम बचुटे यांच्यासह अनेककार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी कार्यकर्त्यांनी संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे. अशा घोषणा देत त्यांना शासकीय मदत मिळावी. तसेच गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे.तसेच या प्रकरणातील दोषी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करावे.दलीत वस्त्या मधील कोंबिंग ओपरेशन्स थांबविण्यात यावे.अशा मागण्यांचे निवेदन तहसीलदार राकेश गिड्डे यांना दिले.

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३०५/२०२४ अॅड. गडकर एम. ए. यांच्या मार्फत**

**अंबिका एकनाथ भोसले वि. निरंक**

**ज्यापेक्षा गणेश पि. एकनाथ भोसले हे दिनांक २१.०२.२०२४ रोजी पिंपळवाडी ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार**

१ अंबिका भ्र. एकनाथ भोसले, वय - ५० वर्षे, रा. पिंपळवाडी ता.जि.बीड
२ एकनाथ पि. भानुदास भोसले, वय - ५५ वर्षे, रा. पिंपळवाडी ता.जि. बीड

अर्जदार क. १ ही मयत नामे गणेश पि.एकनराथ भोसले यांची आई आहे. अर्जदार २ हे मयताचे वडील आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत गणेश पि. एकनाथ भोसले यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख २८ / ०१ / २०२५ आहे.

आज दिनांक १७ डिसेबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**आदेशावरून**
**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

**आदेशावरून**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

## जाहीर प्रगटन

कलम १३ ( ३ ) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनता मौजे वडीरामसगाव ता. घनसावंगी यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. रामनाथ रमाकांत वराडे रा. वडीरामसगाव ता. घनसावंगी जि. जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन त्यांनी त्यांचे स्वतःचे/पत्नी/आई/मुले नामे अविष्कार रामनाथ वराडे यांचा / हिच्या जन्म दि. १७/०५/२००७ ही दर्शविलेली आहे. अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/ आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

# विद्यार्थी विज्ञान मंथन स्पर्धा परीक्षेत श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळविले यश

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विज्ञान मंथन स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात शालेय शिक्षणात स्पर्धा परीक्षांचेअनन्यसाधारण महत्त्व आहे.अगदी बालवयापासूनच प्रज्ञावान विद्यार्थी शोधणे,त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यातील गुणात्मक क्षमतेचा विकास करण्याचे काम शाळेच्या माध्यमातून होते, तसे करणेही काळाची गरज आहे.विद्यार्थी विज्ञान मंथन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.यामध्ये विद्यालयातील इ.९ वी चे २९ विद्यार्थी बसले होते.पैकी तनिष्क ननवरे, कौस्तुभ मातेकर,अंजली शेप,समृध्दी पवार,अक्षद लोकरे या विद्यार्थ्यांना विज्ञान मंथन परीक्षा प्रमुख



किरण नरसिंगे, नंदिनी कोदरकर व विज्ञान विषय प्रमुख मोरेश्वर देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे,मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,सर्व शालेय समितीचे सदस्य, उपमुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्या ; खा.सोनवणें यांनी केंद्रीय क्रीडा मंत्र्यांची भेट घेत मांडला मुद्दा

केज/प्रतिनिधी

स्कूल गेम्स फेडरेशनऑफ इंडिया अंतर्गत सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंना थेट वर्ग एक पदी नियुक्ती देण्यात येत असे.परंतु मागील दहा वर्षात अशी नियुक्ती दिलेलीनाही.यापुढे लाडली बहन म्हणून पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्यावी,अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी मनसुख मांडविय,केंद्रीय क्रीडा मंत्री व रक्षा खडसे, क्रीडा राज्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे. केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविय,आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांना भेटून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया,भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील सलग तीन वर्ष फुटबॉल खेळलेल्या महिला खेळाडू राज्यांचे व देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मोठ्या मेहनतीने खेळतात.या महिला खेळाडूंच्या योगदानाला मान्यता मिळावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी लाडली



बहन खेळाडू म्हणून पावलेउचलण्याची आवश्यकता आहे.त्या अनुषंगाने,सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंच्या लाडली बहन म्हणून थेट भरतीसाठी धोरण तयार करावे.केंद्रीय किंवा राज्य सरकारमध्ये त्यांना वर्ग-१च्या नौकऱ्या देऊन त्यांच्या मेहनतीला योग्य न्याय द्यावा,यामुळे त्यांच्या योगदानाचा सन्मान होईल.तसेच भविष्यात अधिकाधिक महिला खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी प्रेरणा मिळेल.यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करावी,असेही म्हटले आहे.यावेळी राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी ही मागणी अतिशय चांगली असून आपण लवकरच याबाबत निर्णय घेवू असे आश्वासन देखील दिले.

एकट्या बीड जिल्ह्यात राष्ट्रीय पातळीवर सलग तीन वर्षे खेळलेल्या खेळाडूंची संख्या ५० च्या घरात आहे.खा.सोनवणे यांनी केलेल्या मागणी नुसार निर्णय झाल्यास देशातील बहिनींना याचा मोठा फायदा होणार आहे.

पान १ वरून...

**भीमसैनिकासह इतर ...**

पोलिसांना अटक करण्याची मागणी केली आहे यावेळी जिजामाता चौकात घोषणा देत पोलिसांविरोधात कारवाई करा अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली त्यानंतर तहसील प्रशासनाला नायब तहसीलदार बाळू खेडकर यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनावर बाळासाहेब बोराडे अरुण भालेराव युवराज सोनवणे अमोल चव्हाण दिलीप माने मनोहर अवसरमल चंद्रकांत अवसरमल शेख नशीर शेखलाल भीमराव गायकवाड शेख असिफ प्रवीण धनवे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या निवेदनावर सह्या असून यावेळी जिजामाता चौकात जोरदार घोषणा देऊन अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख नगरपंचायत चे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर गणेश भांडेकर गणेश तळेकर भागवत थोरात सावता कातखडे दादा हरिदास बाबुराव झिरपे सोपान मोरे बाळासाहेब गायकवाड अंकुश कांबळे सर्फराज शेख समीर बागवान आशिष भालेराव कदीर शेख आसाराम माने तय्यब खान यांच्यासह अनेक नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते

**ऊस तोडणी कामगारांना ...**

मिळणार आहे पी एम किसान सन्मान निधी हा शेतकऱ्यांना मोठा आधार असून त्याचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे जलजीवन मिशन अंतर्गत ९०% योजना पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून त्यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध व्हावा म्हणजे उर्वरित कामे पूर्ण करून लोकांना प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी मिळणार आहे ही केंद्र आणि राज्य सरकारची मोठी उपलब्ध ठरणार आहे असे सांगत केंद्र आणि राज्य सरकारने आजपर्यंत राबविलेल्या विविध योजना आणि त्याचा सामान्य जनतेला झालेला फायदा याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील जनतेने प्रचंड बहुमताने महायुती सरकारला पसंती दिली असल्याचे सांगत पश्चिम वाहिनीचे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात लवकरात लवकर यावे आणि मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यात यावा अशी मागणी करीत त्यांनी मुख्यमंत्री सौर ऊर्जा पंप या योजनेअंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजना,

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे अभिनंदन केले. तसेच, सर्व शासकीय कामकाज आणि व्यवहार मराठी भाषेतूनच व्हावा, अशी मागणी केली.मनरेगा योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारी रक्कम ही थेट त्याच्या खात्यात जमा करण्याची आवश्यकता आ.धस यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला सरकारकडून परवानगी दिल्याबद्दल अभिनंदन केले.यासह आदी योजनांची अभ्यासपूर्ण केलेली मांडणी यावर सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांनी बाके वाजवून त्यांना प्रतिसाद दिला... सभागृहात अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करत

पान १ वरून...

सरकारच्या निर्णयांचे स्वागत करून त्यांच्या कार्याची प्रशंसा आ.सुरेश धस यांनी केली.

**संतोष देशमुख हत्याकांडाची ...**

देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारून संतोषदेशमुख यांना न्याय देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच येथील यंत्रणा ही धनंजय मुंडे यांचे निकट वर्तीय वाल्मीक कराड हे या हत्याकांडातील मास्टर माईंड आहेत.त्या मास्टर माईंड वाल्मीक कराड यांना वाचविण्यासाठी येथील सत्ताधारी काम करीत असल्याचा जळजळीत आरोप त्यांनी केला.

संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणार :- आ.रोहित पवार यांनी संतोष देशमुख यांची पत्नी अश्विनी,मुलगी कु. वैभवी व मुलगा चि. विराज आणि आई शारदा आणि वडील पंडितराव देशमुख यांचे सांत्वनकेले. तसेच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला उघडे पडू देणार नसून त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या सर्व शिक्षणाची जबाबदारी ते घेणार असल्याचे त्यांनी कबूल केले आहे.

**घाटनांदूर येथे रेल्वे ...**

नाही.त्यामुळे घाटनांदूर मार्गावरुन धावणाऱ्या रेल्वे थांबविण्यात याव्यात, अशा मागणीचे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे बोर्डाचे केंद्रीय अध्यक्ष सतीश कुमार, रेल्वेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्ली येथे भेट घेवून सोमवार ता.१६ डिसेंबर २०२४ रोजी दिले आहे.त्यामुळे घाटनांदूर परिसरातील जनतेची अडचण दूर होणार आहे.अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानक सार्वजनिक वाहतूकी साठी परळी ते लातूर दरम्यान महत्वाचे स्थानक आहे.कोविड-१९महामारी पूर्वी औरंगाबाद-गुंटूर आणि नांदेड-बंगलोर गाड्या नियमितपणे घाटनांदूर येथे थांबत होत्या.परंतु नंतर थांबणे थांबवले गेले.हे घाटनांदूर आणि त्या परिसरातील नागरिकांसाठी असुविधा जनक आहे.त्यामुळे या ठिकाणी रेल्वे गाड्या थांबविण्याच्या सूचना देण्यात याव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे केली आहे.

घाटनांदूर येथे रेल्वे स्थानकावर या गाड्या थांबविण्याची मागणी

घाटनांदूर रेल्वे स्थानक येथे औरंगाबाद-गुंटूर: ट्रेन क्र.१७२५४, गुंटूर - औरंगाबाद: ट्रेन क्र. १७२५३,बंगलोर -नांदेड: ट्रेन क्र. १६५९३, नांदेड - बंगलोर: ट्रेन क्र. १६५९४, नांदेड - पनवेल: ट्रेन क्र. १७६१४, पनवेल - नांदेड: ट्रेन क्र. १७६१३ या रेल्वे थांबविण्यात याव्यात अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

**पैठण नाथ सागर..**

केला. यामुळे पैठण येथील नाथसागर धरणातून उजवा व डा या दोन्ही कालव्यातून शेतकऱ्यांच्या रब्बी पिकासाठी पाण्याचा विसर्ग सुरू आहे. सध्या नाथसागर धरणात एकूण पाणीसाठा २७८१. ५३२ दलघमी असून पाण्याची टक्केवारी ९४.१३ आहे. मागील वर्षी याच तारखेला धरणातील पाण्याची टक्केवारी ४४.१८ नोंद होती.

# संस्कृती विसरल्यामुळे विकृती वाढते.ह.भ.प.- प्रशांत महाराज खानापूरकर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

सद्यःस्थितीत तरुण पिढी आणि समाजातील अनेक घटक संस्कृती विसरत आहेत आणि संस्कृती विसरल्यामुळे विकृती वाढत आहे असे प्रतिपादन ह.भ.प.प्रशांत महाराज खानापूरकर यांनी केले.बीड जिल्ह्या तील अंबाजोगाई तालुक्यातील श्रीक्षेत्र माकेगाव येथे दक्षिण मुखी दत्त मंदिर संस्थान द्वारा आयोजित केलेल्या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या



कीर्तनात श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या दीनआणि दुर्बलासी । सुखरासी हरी कथा ।। या अभंगावर त्यांनी निरूपण केले.पुढे बोलताना ते म्हणाले की, समाजामध्ये तरुण पिढी ही अतिशय वाम मार्गाला जात आहे.व्यसनाच्या आहारी गेलेली पिढी समाजात विकृत कृत्य करत आहेत.या तरुण पिढीलाआवरणे आवरून त्यांना सावरणे आणि त्यांचे प्रबोधन करणे अत्यंत आवश्यक आहे . सध्या तरुण पिढीमध्ये गुन्हेगारी खूप प्रमाणात वाढत आहे याला कारण फिल्मी इंडस्ट्री मध्ये होणारे विकृत दर्शनआणि समाजाने विकृतीला दिलेला आश्रय यामुळे ही तरुण पिढी बर्बाद होत आहे.विकृतीपेक्षा संस्कृती शिकवली पाहिजे. संस्कार,धर्म,न्याय,नीती याविषयी उद्बोधन करणे अत्यंत आवश्यक आहे. संस्कृती टिकली तर समाजातील विकृती कमी होईल आणि अशांत झालेल्या समाज शांत होऊन गुण्यागोविंदाने नांदेल असे प्रतिपादन ह.भ.प.प्रशांत महाराज यांनी केले.याकार्यक्रमाला माकेगाव आणि पंचक्रोशी तील हजारो भाविकांची उपस्थितीहोती.काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमाला राजेसाहेब देशमुख,दगडूसाहेब देशमुख,आऊभैया देशमुख,व्यंकट देशमुख , दादासाहेब देशमुख, सरपंच,उपसरपंच यांच्या सह परिसरातील व गावा तील किर्तनकार,गायक, वादक,प्रतिष्ठित नागरिक भाविक भक्त उपस्थित होते.ह.भ.प.प्रशांत महाराजांच्या या सुंदर सुश्राव्य कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.

# बाहेगव्हाण येथे अखंड हरिनाम सप्ताला सुरुवात महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकाराचे होणार कीर्तन

## पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा

वडवणी ।प्रतिनिधी

प्रथी वर्षीप्रमाणे मार्गशीष महिन्यात गेल्या अनेक वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह बाहेगव्हाण येथे होत असून याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले, श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज व वारकरी संप्रदायाच्या सकल साधु संताच्या कृपाने श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व किर्तन होणार आहे वर्ष ३५ वे कृ. ०१ शके १९४६ सोमवार दि १६/१२/२०२४ ते मार्गशीर्ष कृ. २७ शके १९४६ सोमवार दि २३/१२/२०२४ या कालावधीमध्ये होत आहे अखंड हरिनाम सप्ताह मौजे दि१६/१२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा.कलशारोहण : ह.भ.प.शांतीब्रम्ह नवनाथ महाराज,ह.भ.प. भगवान महाराज राजपुत होणार आसुन श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. भागवताचार्य निरंजन भाईजी महाराज शिंदे यांचे भागवत कथा होणार आहे तर ज्ञानेधरी पारायण नेतृत्व ह.भ.प. हनुमंत महाराज मस्के हे करणारआहेत तसेच निर्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण १० ते १२ गाथा भजन १ ते ५ संगीत भागवत कथा ५ ते ६ हरिपाठ ९ ते ११ हरिकीर्तन व नंतर हरीजागर होईल. तसेच कीर्तनकार म्हणून दि. १६/१२/२०२४ रोजी श्री. ह.भ.प. गणेश महाराज वारंगे,दि १७/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. रामराव महाराज ढोक, दि १८/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. हनुमान महाराज डांबे भागवताचार्य दि १९/१२/२०२४रोजी श्री.ह.भ.प. विलास महाराज गेजगे,दि. २०/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर, दि.२१/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. नामदेव महाराज लबडे,दि.२२/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. सागर महाराज बोराटे, यांचे संध्याकाळी ९ ते११ कीर्तन होईल आहेत व दि २३/१२/२०२४ रोजी सकाळी ११ते १ या वेळेत स्वामी अमोलनंदजी महाराज गिरी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे त्यानंतर महाप्रसादाचा होईल तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहचा लाभ घ्यावा तसेच विशेष मार्गदर्शक: म्हणून ह.भ.प. तात्यासाहेव महाराज मस्के ह.भ.प. डॉ. गोविंद मस्के हे असणार आहेत तसेच सप्ताहाचे यजमान तुळशीराम बळीराम मस्के, शहादेव बळीराम मस्के, अशोक रंगनाथ मस्के, लक्ष्मणराव एकनाच शेळके, ज्ञानेश्वर नवनाथ मस्के, कल्याणराव शाहूराव मस्के, हनुमान एकनाथ मरके, सुरेश राकिसन मस्के, बाबुराव विठ्ठलराव मस्के, अशोक दगडूबा जाधव, शिवाजी अच्युतराव डोरले, शिवदास रामकिशन मस्के, गोरख लक्ष्मणराव गायकवाड, अर्जुन रावसाहेब मस्के, अर्जुन सखाराम मस्के, अशोक नागनाथ कदम, कृष्णा बद्रीनाथ कदम, विकास बाळू कसबे, नवनाथ नारायण मस्के, रामनाथ मुकिंदा मस्के, भागवत बाबुराव मस्के, भरत गिरमाजी नागवे, मधुकरराव किसन चव्हाण, तानाजी दादाराव डांबे, बहादेव अभिमान खाडे, बाबासाहेब दगडूबा जाधव, हनुमंत रावसाहेब मरके, जयसिंग नागनाथ मस्के, भागवत आश्रुबा कदम हे असणार आहेत

# नवीन वर्षात महागाईमुळे केसाबरोबर खिशाला लागणार कात्री

मुंबई : येत्या नवीन वर्षाला वाढत्या महागाईचा फटका बसणार असून सुरुवातीलाच सलून दरामध्ये २० ते ३० टक्के भाववाढ होणार आहे. सलून ब्युटीपार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. दत्तात्रय चव्हाण, महाराष्ट्र अध्यक्ष श्री. प्रसाद चव्हाण , मुंबई अध्यक्ष श्री.तुषार चव्हाण , महाराष्ट्र प्रभारी श्री. उदय टक्के यांनी भाववाढीचा निर्णय जाहीर केला आहे.



नव्या दरवाढीनुसार, शहरी भागासाठी केशकर्तनासह दाढीसाठी व इतर सौंदर्य प्रसाधन कामासाठी २० ते ३० टक्के ज्यादा पैसे मोजावे लागणार आहेत तर ग्रामीण भागासाठी हिच दरवाढ १५ ते २० टक्के असेल. नवीन दरवाढ लक्षात घेऊन ग्राहकांनीही सहकार्य करावे असे आवाहन सलून ब्युटी पार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्य तर्फे करण्यात आले आहे.

कोरोना काळात मागील तीन वर्षात सलून व्यवसायिकांनी कोणतेही दर वाड केली नाही त्यात कच्चा माल, वीज, पाणी आणि कामगारांच्या पगारात वाढ झाल्यामुळे नाईलाजाने सलून दरात वाढ करावी लागली. तसेच जीएसटी दरात देखील उल्लेखनीय वाढ झाली आहे. त्यामुळे मागील तीन वर्षांपासून स्थिर असलेले सलूनचे दर १ जानेवारी २०२५ पासून वाढविण्यात येणार आहेत. असे सलून ब्युटीपार्लर असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष बंधू चव्हाण यांनी सांगितले.

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

नागपूर ।प्रतिनिधी

राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या .ुरहरसीर्शीरेूस.ीस या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले.विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.



राज्यात १ कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मुल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील,असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भुत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.संकेतस्थळाच्या अनावरण प्रसंगी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र शासनाच्या वतीने आम्रपाली सचिन साबळे उत्कृष्ट अभिनयासाठी सन्मानित

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धा मोठ्या उत्साहात संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाने पार पडली,राज्य नाट्य स्पर्धेत बीड व संभाजी नगर केंद्रावर बीड जिल्हा ,धाराशिव जिल्हा ,जालना जिल्हा आणि संभाजी नगर जिल्हा मिळून असे एक केंद्रात साधरील स्पर्धा दिनांक २५ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर क्या दरम्यान अतिशय आनंदी व जल्लोषात पार पडली आहे .

सदरील स्पर्धेत चार जिल्ह्यातून एकूण सोळा नाटके सादर झाली आहेत ,त्यात बीड येथील न्यू प्रगती महिला सेवा भावी संस्था च्या वतीने डॉ. आरुण जऱ्हाड लिखित व प्राध्यापक विनोद दळवी दिग्दर्शित द अँनॉमली हे नाटक सादर करण्यात आले होते.

सदरील नाटकाने रसिक मायबाप प्रेक्षकाची मने जिंकल्या मुळे रसिक प्रेक्षकांनी नाटकास टाळ्यांच्या गजरात नाट्य गृहातील सर्व प्रेक्षक नाटकाशी एकरूप होऊन नाटकातील कलाकारांच्या सादरीकरणाला दाद देत होते. सदरील नाटकात आम्रपाली साबळे यांनी सुचिता नावाची आईची भूमिका साकारली होती,आम्रपाली यांनी रंगमंचावर सुचिता ची भूमिका साकारत असताना प्रेक्षा गृहातील प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते व टाळ्यांचा गजर नाट्य गृहात दुमदुमला होता ,त्यामुळे आम्रपाली साबळे यांना ६३ वी हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील उत्कृष्ट अभिनयासाठी विशेष गुणवत्ता प्रमाण पात्र देवून सन्मानित करण्यात आलं.



सदरील नाटकाचे लेखन डॉ. आरुण जऱ्हाड यांनी केले असून नाटकाचे दिग्दर्शन प्रा.विनोद दळवी यांनी केलेले आहे.

या नाटकात सोनल टाक यांनी नर्स १ ची भूमिका तर दादासाहेब नवघरे यांनी डॉक्टर ची भूमिका सावन गिल यांनी सुधीर , आई – सुनीता नागरगोजे ,बाबा– श्याम टल्ले , बाल कलाकार बेबी एक च्या भूमिकेत कुमारी प्रांजल टाक, बेबी दोन – कुं. श्वेता औसरमोल,बेबी तीन कुमारी कीर्ती शिंदे, जावई – निखिल इच्के, सासू – हिरे मॅडम , सलमान – आमोल गायकवाड, इम्रान – आशोक घुळे, महिला पोलिस – सारिका गायकवाड, इन्स्पेक्टर – राजेंद्र जोसेफ यांनी उत्कृष भूमिका साकारून बीड च्या नाट्य प्रेमी रसिक प्रेक्षकांच्या मनावर आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे.

सदरील नाटकाची तांत्रिक बाजू मधे नाटकासाठी चें संगीत संयोजन राहुल साळवे आणि चिरंजीव सत्यम दळवी यांनी पाहिले तर प्रकाश योजना अशोक घोलप यांनी केली ,रंगभूषा ड वर्षा वेशभूषा ड मनीषा दळवी , नाटकाचे दृशबंध रितेश यादव आणि आदित्य दोडके यांनी केले.या नाटकाचे सूत्रधार बाबासाहेब सोनवणे व सचिन साबळे यांनी काम पाहिले. तर पत्रकार जितेंद्र शिरसाठ यांचे मोलाचे मार्गदर्शन नाटकासाठी झाले ,आम्रपाली साबळे यांना अभिनयाचे विशेष प्रमाण पत्र मिळाल्यामुळे सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे मुख्य सचिव श्री विकास खरगे साहेब, आखिल भारतीय नाट्य परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्ष , बाल रंगभूमी मध्यवरती संघटनेच्या उपाध्यक्ष तथा साहित्य परिषदेच्या डॉक्टर दीपा ताई क्षीरसागर , अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे जिल्हा वेवस्थापक प्रमोद रामदासी तसेच नाटकाचे लेखक डॉक्टर आरूण जऱ्हाड , नाट्य लेखक दिग्दर्शक विनोद डावरे व द अँनोमाली नाटकाचे दिग्दर्शक प्रा.विनोद दळवी व बीड जिल्ह्यातील सर्व नाट्यकर्मी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे

# पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेकडे लेखी तक्रारी द्याव्यात : मुळूक, गलधर

## पवनचक्कीवाल्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात पवनचक्कीचे जाळे दिवसेंदिवस पसरत असून गुंडगिरी ही वाढत आहे. शेतात पवनचक्की उभारण्यासाठी या कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. पवनचक्की कंपनीच्या त्रासाला आणि गुन्हेगारीला वैतागून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पवनचक्की कंपन्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक झाली असून पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेच्या जिल्हा कार्यालयात लेखी स्वरुपात तक्रारी द्याव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

जिल्ह्यात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितल्यास स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर कंपनीचे अधिकारी पोलिसांना हाताशी धरुन उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. पवनचक्कीवाल्यांकडून शेतकऱ्यांची रितसर परवानगी न घेता त्यांच्या शेतामधून तार ओढण्याचे काम केले जात आहे. पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वैतागून सुलतानपूर येथील एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला तर नाईकवाडे नामक शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा प्रकार घडला आहे. ज्या गावात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे त्या गावात या कंपनीकडून स्थानिक गुंडांना हाताशी धरून शेतकऱ्यांना धमकवण्याचे व फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला वैतागून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. आता पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीड जिल्हा शिवसेना आक्रमक झाली आहे. पवन चक्की



कंपनीकडून जिल्ह्यात ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्या सर्व शेतकऱ्यांनी कागदपत्रांसह शिवसेना बीड जिल्हा कार्यालय बार्शी रोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल कराव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

# लहूजी सस्ते यांचे निधन

बीड प्रतिनिधी

गारमाथा (ता.पाटोदा) येथील रहिवाशी लहूजी बापू सस्ते (वय ९०) यांचे वृध्दापकाळाने दि.१७ डिसेंबर रोजी रात्री निधन झाले.लहूजी बापू सस्ते हे धार्मिक होते. गावच्या कोणत्याही कार्यक्रमात त्यांची उपस्थिती असायची. शिवाय सर्वांशी प्रेमाचे संबंध त्यांचे होते. जुण्या काळातील धार्मीक विचार घेवून ते आयुष्य जगले. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. गारमाथा येथील राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली.



त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. मंगळवारी सकाळी दहा वाजता गारमाथा येथील स्वतच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य ड.प्रकाश कवठेकर, पंचायत समिती उपसभापती देवीदास शेंडगे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहूजी बापु सस्ते हे मुकादम आबा सस्ते यांचे वडिल होत.

# डिजिटल अरेस्ट.. कर नाही तर डर का?

आज मोबाईल आपल्या शरीराचं एक अंग आहे असं सर्वजण वागतात. यात आपल्याकडे झालेला दळणवळण क्रांतीमुळे आता ४–ऋआणि ५–ऋतंत्राने सर्वांचे मोबाईल आता इंटरनेट वापरण्यास सक्षम झाले आहेत. डिजिटल इंडियाची झपाट्याने वाटचाल होताना आपणास दिसत आहे. इंटरनेट अर्थात सायबर द्वारे होणाऱ्या गुन्ह्याचे प्रमाणही सोबत वाढत आहे.

जुन्या काळात फसवणूक करण्याचे जे प्रकार होते आजही सुरू असून त्यात आता नव्याची भर पडली आहे असेच म्हणता येईल. या सर्वांवर उपाय म्हणजे कोणतेही तंत्रज्ञान वापरताना त्याची पूर्ण माहिती आपण घेतली पाहिजे आणि त्या माहितीत जर खात्री नसेल तर त्याबाबत इतरांना विचारायला पाहिजे.

आपण डिजिटल व्यवहार करताना यूपीआय चा वापर करतो. यात अधिक सुरक्षितता असावी यासाठी वन टाइम पासवर्ड अर्थात ओटीपी ची सुरुवात त्यासाठी करण्यात आली आहे.अनेकांना तुमचा पासवर्ड द्या असे फोन येतात असा पासवर्ड किंवा ओटीपी कोणतीही बँक मागत नाही याची आपणास माहिती हवी. आणखी होणारा फसवणुकीचा मोठा प्रकार म्हणजे तुमचे कार्ड 'ब्लॉक' झाले आहे ते सुरू करण्यासाठी दिलेल्या लिंक वर क्लिक करा यात आपण कार्ड खरंच ब्लॉक झालं किंवा नाही याची खात्रजमा करण्यापूर्वीच कृती करतो. जे कार्ड 'ब्लॉक' झालय म्हणून संदेश आला त्यावर एखादा व्यवहार केल्यावरच कळेल की येणारा फोन चुकीचा होता. आपण लिंक डाऊनलोड करताच आपली सर्व बँकेची माहिती समोरील व्यक्ती काढून घेते आणि आपले आर्थिक नुकसान होते.

हल्ली एक नव्याने समोर आलेला यातनादायक असा फसवणुकीचा प्रकार म्हणजे 'डिजिटल अरेस्ट' अर्थात इंटरनेट द्वारे अटक करण्याचा प्रकार होय यामध्ये व्यक्तीची आर्थिक नुकसान तर होतेच सोबतच मानसिक छळ देखील होतो. याबाबत समाज माध्यमांवर मला आलेला अनुभव मी शेअर केला आहे तो खालील प्रमाणे.अचानक फोनची बेल वाजली आणि मी फोन उचलला पलीकडून करड्या आवाजात अमुक अमुक नंबर तुमचा आहे का? अशी विचारणा झाली. तुमचे आधार कार्ड वापरून मुंबईमध्ये एक सिम कार्ड वापरत आहे आणि त्यावरील मोबाईल द्वारे अनेक महिलांना अश्लील छायाचित्रे व व्हिडिओ पाठवले आहेत अशी तक्रार आमच्या पोलीस ठाण्याला प्राप्त झाली आहे.. अर्थात समोरील व्यक्ती हिंदीतून बोलत होती म्हणून मी म्हणलं मुंबईतील पोलीस ठाणे असेल तर अधिकाऱ्यांनी मराठीत बोलायला हवे... मी त्याला तसे मराठीत बोला असे सांगितल्यानंतर मै राजेश कुमार हू और मेरा तबादला दिल्ली से मुंबई मे कुछ नही हप्ते हुआ है और मै यहा के पोलीस स्टेशन का इन्चार्ज असे सांगितले. मला एव्हाना शंका होतीच ती आता खात्रीत बदलली की हा खोटा कॉल आहे तरी पलीकडच्या बाजूने तुमच्या विरुद्ध गुन्हा आहे व तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात येत आहे तुम्ही व्हिडिओ कॉल ला उत्तर द्या असे सांगण्यात आले. पुढे काय होणार हे माझ्या एव्हाना लक्षात आले होते त्यामुळे मी त्याला सरळ सांगितले



जर मी मुंबईत गेल्या दीड वर्षात आलोच नाही तर मुंबईतील एखाद्या मोबाईल विक्रेत्याने सिम कार्ड माझ्या आधार कार्ड आधारे दिले कसे याबाबत आपण लोकल पोलीस ठाण्याला कळवा मी त्या पोलीस ठाण्यात जाऊन त्या अधिकाऱ्यांना भेटतो असे म्हणाल्यावर पलीकडून अधिकच जोराने व्हिडिओ कॉल लगाओ... व्हिडिओ कॉल लगाओ असे सुरू झाले त्याने सांगितलेला नंबर दरम्यानच्या काळात मी दुसऱ्या मोबाईलवर ट्रेस केला तसेच संपूर्ण कॉलची रेकॉर्डिंग देखील दुसऱ्या मोबाईल द्वारे व्हिडिओ रेकॉर्ड करून ठेवली व त्याला स्पष्ट बजावले 'नौटंकी बंद करो' असे म्हटल्यावर पलीकडून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ होत फोन कट करण्यात आला त्यानंतर दहा मिनिटांनी मी त्या क्रमांकावर फोन लावला त्यावेळी तो फोन कार्यरत नाही असे उत्तर मला मिळाले. त्याने माझ्या आधार कार्ड वर जो नंबर वापरात आला, तो एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याकडे होता हे देखील माझ्या वैयक्तिक तपसात लक्षात आले परंतु अशाप्रकारे अनेकांना फसवले जात आहे याकरिता ही पोस्ट मी या माध्यमातून करीत आहे.

ही ती पोस्ट होती

मुळात आपणास फोन आल्यावर आपण त्यातील सत्यता आपल्या दिनचर्येशी लावून शोधावी समोरची व्यक्ती दरडावणीच्या सुरात जे आरोप करीत आहे ते कृत्य आपण खरोखरच केले का? हे स्वतःला विचारावे समोरच्याने आपली माहिती याच सायबरच्या महाजालातून काढलेली असते आणि त्याला साधन बनवून मासे गिरवायला बसतो त्याप्रमाणे गळ टाकलेला असतो (मासे गिरवणे हा कोकणी शब्द आहे) आपण मासा म्हणून गळाला लागल्याचे जाणवल्यावर तो आपले 'हातखंडे' दाखवत पैसे उकळण्याचा प्रयत्न करतो.प्रथम लक्षात ठेवा अशी कोणतीही 'डिजिटल अरेस्ट' कायद्यात नाही आणि दुसरं म्हणजे 'कर नाही तर डर कशाला?' कोणत्याही गुन्ह्यात प्रत्यक्ष घरी जाऊन ताब्यात घेतले जाते ते देखील स्थानिक पोलिसांच्या मदतीने. याबाबत पहिले आपल्या नजीकच्या पोलीस ठाण्यात कळविले जाते. असा फोन आल्यावर आपण पोलीस ठाण्यात याची खातरजमा करू शकता.

आपण आपले आधार कार्ड अनेक ठिकाणी दाखवतो तसेच त्याची प्रत देखील अनेकदा देतो. अशा माहिती द्वारे तुमच्याबाबत इंटरनेटवर माहिती काढता येते त्यामुळे याबाबत आपण कुठे याचा वापर केला याची नोंद ठेवल्यास असे फोन खोटे आहेत, हे कळण्यास वेळ लागत नाही.

आपली चूक आपल्याला माहिती असते मात्र घाबरून गेल्याने अनेकदा समोरची व्यक्ती त्याचा गैरफायदा घेते आणि त्यात त्यांचे प्राविण्य असल्याने लोकांची हमखास फसवणूक होते. अशा प्रकारचा फोन आपणास आला तर लक्षात ठेवा आपण सायबर पोलिसांच्या १९३० या टोल फ्री क्रमांकावर सूचना द्या. पोलीस अटके संदर्भात व्हॉट्सअप किंवा इतर माध्यमातून डिजिटल अरेस्ट साठी व्हिडिओ कॉल करत नाहीत हे लक्षात घ्या व इतरांनाही सांगा आपण सुरक्षित राहण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे प्रत्येक बाबीची खात्री केल्याखेरीज कृती न करणे सावध रहा सुरक्षित रहा.

**(प्रशांत विजया अनंत दैठणकर)**
जिल्हा माहिती अधिकारी बीड चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

# नागपूर मेट्रो प्रकल्प टप्पा-२ साठी १५२७ कोटींचे अर्थसहाय्य

नागपूर ।प्रतिनिधी

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १५२७ कोटी रुपयांचे (२०० मिलियन डॉलर) अर्थसहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात यासंदर्भात आज सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि आशियाई विकास बँकेच्या संचालक मिओ ओका यांनी अर्थसहाय्याच्या करारावर सह्या केल्या. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी आशियाई विकास बँक (-ऊ्ह) आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्याकडून एकूण ३५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे. त्यापैकी १५२७ कोटी रुपये आशियाई विकास बँकेकडून मिळणार असून त्यासंदर्भातील करार आज करण्यात आला. महामेट्रोला हा वित्तपुरवठा जपानी येन या चलनामध्ये मिळणार आहे. त्यामुळे कर्जावर तुलनेने कमी व्याज द्यावे लागणार आहे. महा मेट्रोला या कर्जाची रक्कम केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या (चेक्ग-) माध्यमातून उपलब्ध केली जाणार आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-२ हा खापरी ते एमआयडीसी इएसआर दरम्यान १८.५ किलोमीटर, ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी दरम्यान १३ किलोमीटर, प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्टनगर दरम्यान ५.६ किलोमीटर आणि लोकमान्यनगर ते हिंगणा दरम्यान ६.७ किलोमीटर असा एकूण ४३.८ किलोमीटरचा असणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा लाभ नागपूर परिसरातील १० लाख रहिवाशांना होणार आहे.

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव आश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, विविध विभागांचे सचिव, आशियाई विकास बँकेचे विविध विषयतज्ज्ञ यांच्यासह महामेट्रोचे संचालक (एसपी) अनिलकुमार कोकाटे, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे आदी उपस्थित होते.






## धारूर शहर कडकडीत बंद

धारूर / प्रतिनिधि

परभणी येथे झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधान प्रतीची विटंबना केल्याप्रकरणी कडक कारवाई करणे बाबत परभणी येथील कोंबिंगऑपरेशन तात्काळ थांबविणे बाबत व परभणी येथील प्रकरणात भीमसैनिकावर झालेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घेणे बाबत व भीमसैनिकांनी सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीमध्ये मृत्यू झाला आहे त्या निषेधार्थ १७ डिसेंबर रोजी किल्ले धारूर सकल भीमसैनिकांच्या वतीने धारूर शहर बंद करण्यात आले असून शहरात शभर टक्के प्रतिसाद मिळाला असून धारूर शहरात वातावरण सर्व शांतते मध्ये पहायला मिळाले.

## खोडस परीसरात महीला शेतकरी गटाची शिवारफेरी उत्साहात संपन्न

धारूर / प्रतिनिधी

धारूर तालूक्यातील महीला शेतकरी बचत गटाच्या महीलाची शिवार फेरी पाणी फाऊंडेशन,. दळवे कृषीफार्म व कृषी विभागाचे आत्मा विभागाचे वतीने खोडस परीसरात शिवारफेरी उत्साहात संपन्न झाली यावेळी विवीध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. दळवे कृषी कन्या फार्म खोडस येथे मराठवाडा पाणी फाऊंडेशन विभाग धारूर व आत्मा यांच्या वतीने शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. शिवारफेरी भध्ये पाणी फाऊंडेशनचे मराठवाडा प्रमुख संतोष शिनगारे व आत्माचे ज्ञानेश् धस हे मार्गदर्शन करण्या साठी उपस्थीत होते. शिवार फेरीत रणझुंझार शेतकरी गट,खोडसचे शुभम देशमुख,संत बाळूमामा शेतकरी गट व वरहकट्टाडीचे कैलास वरकटे,कानिफनाथ शेतकरी गट,मोहखेडचे वसुंधरा महिला शेतकरी गट, गांजापुर संत गोरोबाकाका महिला शेतकरी बचत गट,संत जनाबाई महिला शेतकरी



गट,ज्ञानगंगा महिला शेतकरी गट वरकटवाडी, जिजाऊ महिला शेतकरी गट शिंगणवाडी, रुक्मिणी महिला शेतकरी गट खोडस,सदरील महिला पदाधिकार्यांचा सुरेखा दळवे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. या महिला शेतकरी बांधवांना मुख्यध्यापक काशीनाथ दळवे यांनी जैविक कुंपण याची प्रात्यक्षिकं दाखवून सदरील कुंपणाचे महत्व,वारा,पाऊस यांचे तसेच जंगलात असणारे हिंस्र प्राणी यांच्यापासून आपले,पिकांचे रक्षण कसे होते हे पटवून दिले. त्यांनी बांधावर केलेली चिंचाची ५० झाडे, राही जाभळ व त्यांचे संगोपन करून ती झाडे फळावर आणली. त्यांनी लागवड केलेली २५ मोठी जांभळे, २०० सागवान, २० आवळा यांचें आवर्षण असताना केलेले संगोपण व विशद करून आज ही सर्व झाडे भविष्यात जास्त कष्ट न करता कशी उत्पन्न देणार आहेत, याचा होनारा आर्थिक लाभ सांगितला. सदरील कार्यक्रमात मराठवाडा पाणी फाउंडेशनचे विभाग प्रमुख संतोष शिंगारे व आत्माचे ज्ञानेश् धस साहेबांनी माझी मुख्याध्यापक दळवे सर यांनी सेवानिवृत्तीनंतर आपली नाल कशी शेतीशी ठेवली हे सांगून त्यांनी एक आदर्श शेतकरी आहेत, असे आपल्या मनोगतात विशद केले. त्याचबरोबर सरांचे बंधू ग्रामसेवक गोरखनाथ दळवे आणि सुरेखा दळवे यांचेही कौतुक केले. तर आत्माचे ज्ञानेश् धस हे ३५ वर्ष सेवा करूनही आज २५ वर्ष वयाच्या मुलांना लाजवेल अशा प्रकारचे काम आजही ते करत असून आपण यांच्या अनुभवाला निश्चित ते मार्गदर्शन करू असे सांगितले. या कार्यक्रमास १० गावचे महिला बचत गट तर अनेक शेतकरी उपस्थित राहिल्याबद्दल नितीन पाटोळे, सिद्धार्थ कवडे व सर्व शेतकरी यांचे खोडसचे तरुण शेतकरी संतोष देशमुख यांनी आभार मानले.

## अंबाजोगाई शहरात आंतरजिल्हा मोटार सायकल चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेने केली जेरबंद

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी बीडचे पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक १५/१२/२०२४ रोजी पोलीस पोउपनि श्री. सुशांत सुतळे यांना पो.स्टे.अंबाजोगाई शहर गुरनं ५३१/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. या गुन्हयातील मोटार सायकल ही वीरसिंग शेरसिंग गोके रा.सदर बाजार रोड अंबाजोगाई याने चोरुन नेली असल्याची माहिती मिळाली तेव्हा सदर माहिती पो.नि. श्री. उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी आरोपीचा शोध घेवुन तपासाबाबत मार्गदर्शन केले त्यावरुन पोउपनि श्री. तुतळे व त्यांचे पथक तात्काळ अंबाजोगाई येथे रवाना होवुन आरोपीचा शोध घेत असतांना वीरसिंग गोके हा चनई रोडवर सिताफळ संशोधन केंद्राजवळ चोरीची गाडी विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली वरुन सदर ठिकाणी तो पथकाला पाहुन गाडीघेवुन पळुन जाण्याचे बेतात असतांना पथकाने सापळा लावुन त्यास पकडले. त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव वीरसिंग शेरसिंग गोके वय २२ वर्षे रा.बी.एन्ड सि ऑफिसचे बाजुस सदर बाजार रोड अंबाजोगाई असे सांगितले व त्यास त्याचे ताब्यातील स्पेंडर प्लस मॉडेलची मो.सा.संदर्भात विचारपुस केली असता त्याने मोटार सायकल ही त्याच्या साथीदाराने चोरुन आणली आहे. अभिलेख पडताळणी केली असता वरील गुन्हयातील मोटार सायकल निष्पन्न झाली.




## वाढत्या थंडीत संधिवाताचाही जोर

प्रतिनिधी ।पुणे

पुणे : हिवाळ्याच्या दिवसात थंडी चांगलीच कडाक्याची असते. अशात गेल्या काही दिवसांपासून तापमानात घट होऊन थंडीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे वाढत्या थंडीमुळे संधिवाताच्या रुग्णांना सर्वाधिक त्रास जाणवत आहे. त्यामुळे पुणे परिसरात संधिवातसंबंधित रुग्णांची संख्या वाढली आहे.

पुणे ग्रामीण भागातील नागरिकांना वाढत्या थंडीबरोबरच सांधेदुखी, संधितावातही त्रस्त करीत आहे. प्रामुख्याने आधीपासून वात असलेल्यांसह ज्येष्ठ आणि महिला रुग्णांमध्ये हा त्रास वाढत आहे. अशा व्यक्तींनी दक्षता घेणे गरजेचे असल्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला. हिवाळ्यात कमी तापमानामुळे शरीरातील सायनोव्हियल द्रवपदार्थाची मात्रा वाढून सांधेदुखी बळावते. सांधे कडक होतात आणि त्यामुळे वेदना जाणवतात. सांध्यामध्ये वेदनांसह, सूज, जळजळ, सांधे कडक होणे असे त्रास होतात. थंड वातावरणामुळे बोटे आणि पायांमधील रक्ताभिसरण कमी होते. हिवाळ्यात कमी सूर्यप्रकाशामुळे 'ड' जीवनसत्त्वाचे प्रमाण कमी होऊन सांधे दुखायला लागतात.

काळजी अशी घ्यावी

गरम पोशाख करून शरीर उबदार ठेवा. त्यासाठी घरात असतानाही हातमोजे, पायमोजे घाला. शरीरातील ताकद, लवचिकता वाढवण्यासाठी, वेदना कमी करण्यासाठी हालचाली करा.'ड' जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होऊ नये म्हणून कोवळ्या उन्हात फिरणे. त्यामुळे 'ड' जीवनसत्त्वाची पुरेशी मात्रा मिळते. गरम पाण्याने अंघोळ करणे. ओमेगा-थ्री फॅटी सिडयुक्त आहाराचे सेवन करणे. सांधेदुखीला कारणीभूत ठरणारे प्रक्रिया केलेले, साखरयुक्त आणि तळलेले पदार्थ, शीतपेयांचे सेवन टाळणे.

संधिवातासाठी आनुवंशिकता, विषाणूजन्य आजारांचे संक्रमण, आपण राहतो त्या ठिकाणचे वातावरण यानुसार संधिवाताचा त्रास होऊ शकतो. सकाळी उठल्यावर हात आखडले असल्यास गरम पाण्यात हात बुडवावेत आणि त्यानंतर व्यायाम करावा. अवयवांना गार हवा लागल्यास दुखणे सुरू होते. फिजिओथेरपी शिकून घेऊन व्यायाम करणे उपयुक्त ठरते. ज्यांना आधीपासून संधिवाताचा त्रास आहे त्यांनी औषधे सुरू ठेवावीत. दुखणे वाढल्यावर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

- डॉ. पल्लवी मेहरे , वाघोली ,पुणे.

थंडीमध्ये संधिवात, सांधेदुखीचा त्रास वाढतो. या काळात सर्वसाधारणपणे या रुग्णांची नेहमीच्या तुलनेत १० ते १५ टक्के वाढ होते. त्यात ६५ वर्षे वयावरील रुग्ण जास्त आहेत. हिवाळ्यात खासकरून पाय, कपाळ आणि गुडघ्याची काळजी घ्यायला हवी. दुचाकीवरून



जाताना गार हवा कपाळाला लागली तरी हा त्रास वाढलेला दिसतो. घरातील फरशीवर अनवाणी न फिरणे, गार हवा लागू न देणे गरजेचे असते. गुडघ्यावर पट्टी (नी कॅप) लावणे योग्य ठरते.

- डॉ. सुजाता दिपके, वाघोली, पुणे.

## सुवर्णप्राशन संस्कार शिबिराचा लाभ प्रत्येक नागरिकाने आपल्या बालकांसाठी घेण्याचे आवाहन!

पुणे : सुवर्णप्राशनं हि एतत् मेधाग्निबलवर्धनम् ।आयुष्यं मंगलं पुण्यम वृष्यं वर्ण्यमं ग्रहापहम् ।। पुष्य नक्षत्राच्या मुहूर्तावर चंदननगर पुणे येथील खुळेवाडी मध्ये धन्वंतरी क्लीनिक संचलित डॉ. प्रतिभा वेताळ यांच्या क्लिनिक मध्ये दि १८ डिसेंबर २०२४ रोजी बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे .तरी नागरिकांनी आपल्या बालकांसाठी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ प्रतिभा वेताळ यांच्या तर्फे करण्यात आले आहे.



सुवर्णप्राशन संस्कार कुणासाठी आवश्यक?

नवजात बालकांपासून ते १६ वर्षाची मुल-मुली वारंवार आजारी पडत असतील, मुलांची शारीरिक वाढ योग्य प्रमाणात होत नसेल मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नसेल तर दोन थेंब बाळाला द्या सुवर्णप्राशनाचे, वरदान लाभेल आरोग्य व बौद्धिक विकासाचे बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी हे सुवर्णप्राशन तयार करण्यात आले आहे.

सुवर्णप्राशनाचे असे आहेत फायदे

- बुद्धीमत्ता, स्मरणशक्ती वाढते.रोगप्रतिकारशक्ती वाढते, त्यामुळे बालक वारंवार आजारी पडत नाही. बुद्धी कुशाग्र , तल्लख होते. एकाग्रता वाढून अभ्यासात मन स्थिर होते. शारीरिक विकास योग्य प्रमाणात होतो. मुलांची पचनशक्ती वाढून मुले सुदृढ होतात.तसेच ऋतुबदलांमुळे होणाऱ्या आजारांविरुद्ध प्रतिकारशक्ती वाढते

प्रत्येक महिन्याच्या पुष्य नक्षत्राला होणार संस्कार

खुळेवाडी चंदननगर येथील धन्वंतरी क्लिनिक डॉ. प्रतिभा वेताळ यांच्या क्लिनिक मध्ये प्रत्येक महिन्याच्या पुष्य नक्षत्राच्या दिवशी बालकांवर सुवर्णप्राशन संस्कार करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी आपल्या बालकांसाठी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ प्रतिभा वेताळ यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

## पाटोदा तालुक्यातील मंझरी (घाट) जलजीवन योजनेंतर्गत कामाच्या चौकशीसाठी दोन दिवसांपासून ग्रामस्थांचे उपोषण सुरू

पाटोदा : पाटोदा तालुक्यातील मंझरी ( घाट) येथील ग्रामस्थ जलजीवन योजनेंतर्गत ६७ लक्ष रूपये कामाच्या निकृष्ट दर्जाचे व रखडलेले काम पूर्ण करण्यात यावे यासाठी २ दिवसांपासून ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले असुन २ दिवसात जलजीवन आधिका-यांनी उपोषणाची दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना विनंती केल्यानंतर डॉ.गणेश ढवळे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेत राजेंद्र मोराळे प्रकल्प जलजीवन मिशन जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद सांधत ग्रामस्थांची कैफियत मांडली. राजेंद्र मोराळे यांनी संबंधित उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग पाटोदा कुलकर्णी यांना फोन करून आंदोलनस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या समस्या ऐकून निराकरण करण्यात येईल असे डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.



पाटोदा तालुक्यातील ६५० लोकसंख्या असलेल्या मंझरी ( घाट) गावातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत २ वर्षांपूर्वी ६७ लाख रुपये मंजूर झाले. गेल्यावर्षी पावसाळ्यात गावातील सिमेंट रस्ते खोदून निकृष्ट दर्जाचे पाईप टाकण्यात आले. विहिरीचे काम करण्यात आले नाही. टाकीचे काम निकृष्ट असुन पाणी मारले नाही. योजना अपुर्ण असून ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. वर्षभरापासून कंत्राटदार व अधिकारी यांना काम पूर्ण करण्याचे लेखी निवेदन देऊनही कोणतीही दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी दोन दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर कडाक्याच्या थंडीत बेमुदत उपोषण सुरू केले असुन आज दुपारपर्यंत कोणत्याही आधिका-याने उपोषणाला भेट दिली नाही. यावेळी आंदोलनात प्रकाश नांदे, बाजीराव गिते, आकाश नांदे, पोपट शिंदे, प्रल्हाद भांबे,संदिप गिते, ईश्वर नांदे, महादेव भांबे, प्रकाश गिते,संजय गिते संगीत नांदे, श्रीराम नांदे, महादेव नांदे, लक्ष्मण नांदे आदी ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

## विवाहित महिलेवर अत्याचार

### ब्लॅक मेल करत उकळले पैसे. जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

इन्स्टाग्रामवर कॉल करून तू माझ्याशी बोल नाहीस तर तुझे कॉल रेकॉर्डिंग व मेसेज मी व्हायरल करेल असे म्हणुन महिलेला ब्लॅकमेल करून तिच्याकडून पैसे उकळले तसेच तू मला भेटली नाही तर तुझे लॉजमध्ये काढलेले अश्लील फोटो व्हायरल करेल अशी धमकी देऊन पीडित महिलेवर अत्याचार केला. या प्रकरणी एकजणा विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत महीलेने जामखेड पोलीस स्टेशनला फीर्याद दाखल केली आसुन आरोपी सागर बाळु लोखंडे रा. आरोळे वस्ती, जामखेड याच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांन कडून मिळालेली माहिती अशी की आरोपीने पिडीत महीलेला इन्स्टाग्रामवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली तसेच इन्स्टाग्रामवर कॉल करुन तु मला आवडतेस, मला कॉल करत जा, माझ्याशी बोलली नाही तर मी तुझ्या मुलाला व नवर्याला मारुन टाकेल, माझ्याकडे बंदुक आहे आशी धमकी दिली. त्यानंतर या धमकी मुळे महीलेने त्याच्याशी इन्स्टाग्रामवर बोलण्यास सुरवात केली. काही दिवसांनी तो पिडीत महीलेला पैसै मागायला लागला व वेळोवेळी तिला धमकी देऊन ३० हजार ते ४० हजार रूपये पिडीत महीलेकडुन घेतले.

त्यानंतर काही महीन्यांनी आरोपी सागर लोखंडे याने महीलेस फोन केला व लॉजवर भेटायला बोलवले, तु आली नाही तर घरी येऊन तुला मारुन टाकेल आशी धमकी महीलेस दिली. त्यामुळे ती महीला घाबरली व तिला लॉजवर घेऊन गेला व पिडीत महीलेवर अत्याचार केला. त्यानंतर आरोपी हा वेळोवेळी पिडीत महीलेस लॉजवर बोलावत होता. परंतु पिडीत महीला गेली नाही. त्यामुळे आरोपी सागर लोखंडे याने पिडीत महीलेस धमकी दिली की तु जर माझ्या सोबत लॉजवर आली नाही तर तुझ्या सोबतचे लॉजमध्ये काढलेले अश्लील फोटो मी व्हायरल करेल अशी धमकी दिली.

पिडीत महीलेस आरोपी हा जास्त त्रास देत असल्याने आखेर ही घटना तीने आपल्या पतीस सांगितली. यानंतर पिडीत महीलेने शनिवार दि १४ डीसेंबर २०२४ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सागर बाळु लोखंडे रा. आरोळे वस्ती जामखेड याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जामखेड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक महेश पाटील हे करीत आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बीड जिल्ह्यात ११ महिन्यात १७४ शेतकरी आत्महत्या मात्र मदत केवळ ६५ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना १०९ कुटुंबिय मदतीपासून वंचित

## जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नाही ; मुख्यमंत्र्यांना तक्रार :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकत नसलेली शेती आणि वाढते कर्ज आत्महत्येचे प्रमुख कारण मानले जाते.शेतकऱ्यांना कधी नापिकी,कधी मालाला भाव नाही तर कधी पिकांवर पडणारी रोगराई तर कधी अतिवृष्टी यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडुन नैराश्येपोटी आत्महत्ये सारखं टोकाचं पाऊस उचललं जात आहे.मागील १ जानेवारी २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ या ११ महिन्याच्या कालावधीत बीड जिल्ह्यात १७४ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. प्रशासनाकडे नोंद असलेल्या १७४ शेतकरी आत्महत्यांपैकी मदतीस पात्र १०५ तर अपात्र १७ तर प्रलंबित ५२ असुन केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून १ लाख रूपयांची शासकीय मदत मिळाली आहे असुन १०८ कुटुंबीय मदतीपासून वंचित आहेत.संबधित प्रकरणात प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढुन उर्वरित आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना तातडीने मदत द्यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांना केली आहे.

१ जानेवारी २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान शेतकरी आत्महत्यांची शासन दरबारी नोंद खालील प्रमाणे आहे. एकुण १७४ शेतकरी आत्महत्या,पात्र १०५ , अपात्र १७ , प्रलंबित ५२ आणि मदत ६५ अशी नोंद आहे. जानेवारी महिन्यात १८ आत्महत्या त्यापैकी १४ पात्र ४ अपात्र, प्रलंबित ० ,मदत १४ तर फेब्रुवारी महिन्यात १४आत्महत्या पैकी १२ पात्र, अपात्र २, प्रलंबित ०,मदत १२ तसेच मार्च महिन्यात १२ आत्महत्या पैकी १२ पात्र अपात्र ०, प्रलंबित ०,मदत १२ तसेच एप्रिल महिन्यात आत्महत्या १३ पैकी पात्र १२ , अपात्र १ , प्रलंबित ०,मदत ९ तसेच मे महिन्यात १३ शेतकरी आत्महत्या पैकी पात्र १२ , अपात्र १ , प्रलंबित ० ,मदत ०३ तसेच जुन महिन्यात २९ आत्महत्या, पात्र २३ , अपात्र ०५ , प्रलंबित ०१ ,मदत १३ तसेच जुलै महिन्यात १४ आत्महत्या पैकी पात्र ०८ , अपात्र ०३ , प्रलंबित ०३ ,मदत ०२ तसेच ऑगस्ट महिन्यात १४ आत्महत्या पैकी पात्र ०५, अपात्र ०१, प्रलंबित ०८ ,मदत ०० तसेच सप्टेंबर महिन्यात १५ आत्महत्या पैकी ०७ पात्र, अपात्र ०, प्रलंबित ०८ ,मदत ० तसेच ऑक्टोबर महिन्यात ०९ आत्महत्या पैकी पात्र ०, अपात्र ० , प्रलंबित ०९ मदत ० तसेच नोव्हेंबर महिन्यात २३ आत्महत्या पैकी पात्र ० , अपात्र ०, प्रलंबित २३ मदत ० एकुण ११ महिन्यांत १७४ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी १०५ मदतीस पात्र,१७ अपात्र तर ५२ प्रलंबित आणि ६५ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत देण्यात आली आहे.

राज्य सरकारकडुन नैसर्गिक संकट आणि ईतर समस्यांमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार मिळावा. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी म्हणून पिक विमा,नुकसानीचे अनुदान, विविध योजना, हमीभाव आदि उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी आत्महत्येचे सत्र थांबताना दिसुन येत नाही. सरकारच्या उपाययोजना प्रभावहीन असल्याचे दिसून येते.शासनाकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना दिली जाणारी १ लाख रुपयांची मदत सुद्धा वेळेवर दिली जात नाही हे अतिशय खेदजनक असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

७ ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीने शासकीय मदत मिळावी यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते.त्याअनुषंगाने



दि.१० ऑक्टोबर रोजी नरेंद्र कुलकर्णी तहसीलदार महसूल -२ जिल्हा दंडाधिकारी कार्यालय बीड यांनी आंदोलनाच्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्ती विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना निवेदनातील नमुद मुद्यांबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाही बाबत अर्जदार यांना अवगत करावे असे लेखी पत्रक काढले मात्र ऑक्टोबर महिन्यात ०९ आणि नोव्हेंबर महिन्यात २३ शेतकरी आत्महत्या होऊन दोन्ही महिन्यांतील एकुण ३२ प्रकरणे प्रलंबित आहेत.त्यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाला शेतकरी आत्महत्यांचे गांभीर्य नसुन केवळ कागदी घोडे नाचवण्यात प्रशासन मग्न असल्याची संतापजनक प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

# मुख्याध्यापकांचे सुरक्षा व सुरक्षितता चे जिल्हास्तरीय प्रशिक्षण अंबड तालुक्यामध्ये संपन्न.

अंबड ।प्रतिनिधी

दि. १३/१२/२०२४ रोजी जालना जिल्ह्यामध्ये मुख्याध्यापकांचे सुरक्षा व सुरक्षितता या उपक्रमाचे तालुकास्तरीय शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केलेले होते हा उपक्रम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई व स्किल ट्री कन्सल्टिंग लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद संचालक आर.विमला मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर राबवण्यात येत असून जालना जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मा. कैलास दातखीळ सर यांच्या सूचनेप्रमाणे आज प्रशिक्षण देण्यात आले असून, स्वतः गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण साहेब ,अंबड शहागडकर साहेब, आटोळे साहेब विस्तारधिकारी, गंगावणे साहेब व तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते .या प्रशिक्षणाचा शाळेतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना फायदा होईल अशी अपेक्षा गटशिक्षणाधिकारी यांनी व्यक्त केली आहे.जिल्हा समन्वयक प्रशांत राठोड व विनोद राठोड, वन सिंग राठोड व त्यांच्या टीम ने ट्रेनिंग यशस्वीरित्या पार पाडली.



# आईच्या अंत्यविधीनंतर अवघ्या तीन तासात मुलाचाही मृत्यू !

मानूर ।प्रतिनिधी

आईचा वृध्दापकाळाने मृत्यू झाला तिचा अंत्यविधी करून घरी परतल्यानंतर अवघ्या तीन तासात मुलाचा हृदयविकाराच्या तिव्र धक्क्याने निधन झाले ,दैवदूर्विलासाने आईच्या चितेशेजारीच मुलाची चिता ही हृदय पिळवटून टाकणारी घटना जामखेड तालुक्यातील खर्डा या गावांत मंगळवारी घडली ,मयत आईचे माहेर आणि मयत मुलाची सासरवाडी शिरूरकासार असल्याने दोन्ही गावांत शोककळा पसरली .

खर्डा येथील रहिवासी ईंदूबाई दत्तात्रय तंटक वय वर्ष ८९ यांचे वृध्दापकाळानी सोमवारी रात्री साडेनवूच्या सुमारास निधन झाले मंगळवारी त्यांचा अंत्यविधी करून आल्यानंतर दुस-या नंबरचा मुलगा किशोर तंटक वय ६१ वर्ष यांना आईच्या निधनाचे दु:ख सहन न झाल्याने हृदयविकाराचा तिव्र झटका





### आईच्या चितेशेजारी मुलाची चिता ! आईचे माहेर आणि मुलाची सासरवाडी शिरूरकासार !

आला त्यांना तातडीने जामखेडला नेले मात्र त्यांची प्राणज्योत मालवली .

ईंदुबाई तंटक यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून अगदी खाणावळ चालवून मुलांना शिक्षण देऊन संस्कारीत केले होते ,मोठा मुलगा अशोक हा सेवानिवृत्त शिक्षक असुन त्यांची मुलेही उच्चशिक्षीत आहे तसेच धाकटा मुलगा रवि हा देखील प्राध्यापक आहे मधला किशोर तंटक व्यापारी मात्र त्याने देखील मुलांना शिक्षण देऊन नोकरीला लावले असा सर्व सुखी संपन्न संसारात आई आणि तीचा मुलगा दोघे एकाच वेळी निरोप घेतात ही गोष्ट अत्यंत वेदनादायी ठरली .खर्डा गावचे ग्रामस्थ व तंटक परिवाराचे नातेवाईक व मित्रपरिवार अंत्यविधीसाठी मोठ्या संखेने उपस्थित होते ,कासार समाजातील बहुधा अशी दुहेरी दु:खदायक घटना प्रथमच असावी असे बोलले जात होते .

दोंघाची हस्ती आणि रक्षा विसर्जन एकाच दिवशी ! मायलेकाचा हा अंत्यविधी व त्यांचा रक्षा विसर्जनाचा विधी एकाच दिवशी हे निश्चितच तंटक कुटूंबासाठी अस्मानी संकट मानले गेले .मयत ईंदुबाई या शिरूर कासार तालुका लोकमत प्रतिनिधी विजयकुमार गाडेकर यांच्या माऊशी होत्या तर मयत किशोर तंटक हे मावसभाऊ होते .मयत ईंदूबाई व किशोर तंटक यांचे पश्चात दोन मुल ,दोन मुली ,तीन सुना ,नातु ,नातसुना असा मोठा परिवार आहे

# डॉ.आकाश ढेरे यांचा मानूर येथे भव्य नागरी सन्मान संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनातर्फे घेण्यात आलेल्या ५ ऑगस्ट २०२४ रोजीच्या वैद्यकीय अधिकारी गट अ च्या एम.पी.एस.सी. परीक्षेत महाराष्ट्रातून चौथा क्रमांक मिळवत डॉ.आकाश विक्रम ढेरे यांनी उत्तुंग यश मिळवल्याबद्दल मानूर येथे त्यांचा भव्य नागरी सन्मान करण्यात आला. आकाश ढेरे यांनी पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण जि. प.कें.प्रा.शाळा मानूर येथे पूर्ण केले. यावेळी बाळासाहेब शिरसाट सर, मीठू आव्हाड सर, जालिंदर गायकवाड सर, सोमनाथ आंधळे सर,सुजाता बडे मॅडम, घुले मॅडम,आशा काळे मॅडम या सर्वांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.माध्यमिक शिक्षण रेणुका विद्यालय मानूर येथे त्यांनी पूर्ण करत आज वैद्यकीय अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे मानूर गावच्या नावलौकिकात भर पडली आहे. ग्रामीण भागात राहून अभ्यासाशी घट्ट मैत्री ठेवत आकाश ढेरे यांनी ज्ञानार्जन करत आज हे उत्तुंग यश मिळवले म्हणून मानूर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.दशरथरावजी वनवे दादा, मानूर गावचे सरपंच अशोक मामा पाखरे, रामदास बडे, भारत आण्णा पाखरे,आदिनाथ आबा नागरगोजे, बाळासाहेब शिरसाट, जयसिंग सिरसाट, मोहब्बत पठाण,सुभाष आप्पा शिरसाट, भगवान पाखरे, विठ्ठल बडे, सलीम पठाण, पी.जी. पाखरे सर, कैलास तुपे सर, जालिंदर गायकवाड सर,केशव शिरसाठ सर,बाळासाहेब सुरसे सर, बाळासाहेब शिरसाट सर, मिठू आव्हाड सर,सुरेश खेडकर सर, अमोल पवार त्याचबरोबर रेणुका माध्यमिक विद्यालय मानूर येथील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी मित्र व नागरिक उपस्थित होते. वयाच्या २४ व्या वर्षीच डॉ.आकाश ढेरे हे वैद्यकीय अधिकारी झाले असून त्यांनी पुढील मोठे यश पादांक्रात करावे असे मत रामदास बडे यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. आकाश बाल वयापासूनच अभ्यासाची आवड ठेवणारा मुलगा होता. तो माझा भाचा आहे माझी बहीण त्याच्यावर विशेष लक्ष देऊन असायची म्हणूनच आज हे यश तो मिळवू शकला असे मत जालिंदर गायकवाड सर यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. आकाशने हे यश मिळवून आज आमचे स्वप्न पूर्ण केल्याने खूप आनंद झाला आहे विद्यार्थ्यांनो तुम्हीही असेच यश मिळवा असे मत आकाशच्या आई अनिता गायकवाड मॅडम यांनी व्यक्त करत सर्वांचे आभार मानले. आकाशने मानूर गावचे नाव उज्ज्वल केले आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो असे मत आदिनाथ नागरगोजे आबा यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. प्रयत्न करणाऱ्याला यश मिळते आकाशने एवढ्यावर न थांबता अजून पुढचा टप्पा गाठावा असे मत दशरथरावजी वनवे दादा यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे बहरदार सूत्रसंचालन शिवचरित्रकार कैलास तुप






# महायुतीच्या मंत्रिमंडळात ओबीसीची बुलंद तोफ छगन भुजबळ व गोपीचंद पडळकर यांना डावलले

अंबड ।प्रतिनिधी

ओबीसी समाजाचे वरिष्ठ नेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब व गोपीचंद पडळकर साहेब यांना नुकत्याच पार पडलेल्या महायुतीच्या मंत्रीमंडळात समाविष्ट न केल्यामुळे ओबीसी समाजामध्ये तीव्र नाराजी पसरली असुन महायुती सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब सांगतात की आमचा डि.एन.ए ओबीसीचा आहे आणि एकीकडे ओबीसी नेत्यांना संपवण्याचे षडयंत्र चालु आहे.याला ओबीसी समाज बळी पडणार नसून येणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, आदी निवडणुकीत महायुतीला धडा शिकवला जाईल. असा इशारा देण्यात आला आहे.सकल ओबीसी समाज बांधवांच्या वतीने अजित पवार,यांच्या प्रतीमेस जोडो मारण्यात आले. महायुतीचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या सरकार विरुद्ध तीव्र घोषणाबाजी करून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी अंबड ओबीसी समाजाची बुलंद तोफ रवींद्र खरात, रामशेठ लांडे, नंदू पुंड, संदीप दादा खरात, डॉ. अभय जाधव, दिनेश गाजरे, विजय खटके, शिवाजी गाजरे, दिलीप राठोड, सुभाषराव चाटे, किशोर मूर्तडकर, गोरख हिरे, संतोष राऊत, योगेश राऊत, परमेश्वर राऊत, ईश्वर पिराणे,बाबासाहेब बटूळे, बाळू गावडे, बाळासाहेब दखने, परमेश्वर भागवत, किरण रहाटगावकर, प्रदीप जीवने , कैलास गादे, आदी ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा तालुक्यातील मंझरी (घाट) जलजीवन योजनेंतर्गत कामाच्या चौकशीसाठी दोन दिवसांपासून ग्रामस्थांचे उपोषण सुरू

## आधिका-यांचे दुर्लक्ष ; तातडीने काम सुरू करण्याच्या लेखी आश्वासनानंतर बेमुदत उपोषण मागे

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मंझरी ( घाट) येथील ग्रामस्थ जलजीवन योजनेंतर्गत ६७ लक्ष रूपये कामाच्या निकृष्ट दर्जाचे व रखडलेले काम पूर्ण करण्यात यावे यासाठी २ दिवसांपासून ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले असुन २ दिवसात जलजीवन आधिका-यांनी उपोषणाची दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना विनंती केल्यानंतर डॉ.गणेश ढवळे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेत राजेंद्र मोराळे प्रकल्प जलजीवन मिशन जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद सांधत ग्रामस्थांची कैफियत मांडली. राजेंद्र मोराळे यांनी संबंधित उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग पाटोदा कुलकर्णी यांना फोन करून आंदोलनस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या समस्या ऐकून निराकरण करण्यात येईल असे डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

पाटोदा तालुक्यातील ६५० लोकसंख्या असलेल्या मंझरी ( घाट) गावातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत २ वर्षांपूर्वी ६७ लाख रुपये मंजूर झाले. गेल्यावर्षी पावसाळ्यात गावातील सिमेंट रस्ते खोदून निकृष्ट दर्जाचे पाईप टाकण्यात आले. विहिरीचे काम करण्यात आले नाही. टाकीचे काम निकृष्ट असुन पाणी मारले नाही. योजना अपुर्ण असून ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. वर्षभरापासून कंत्राटदार व अधिकारी यांना काम पूर्ण करण्याचे लेखी निवेदन देऊनही कोणतीही दखल न घेतल्याने अखेर ग्रामस्थांनी दोन दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर कडाक्याच्या थंडीत बेमुदत उपोषण सुरू केले असुन आज दुपारपर्यंत कोणत्याही आधिका-याने उपोषणाला भेट दिली नाही. यावेळी आंदोलनात प्रकाश नांदे, बाजीराव गिते, आकाश नांदे, पोपट शिंदे, प्रल्हाद भांबे,संदिप गिते, ईश्वर नांदे, महादेव भांबे, प्रकाश गिते,संजय गिते संगीत नांदे, श्रीराम नांदे, महादेव नांदे, लक्ष्मण नांदे आदी ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.